# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**


केगाव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ : http:su.digitaluniversity.ac.in ई-मेल : registrar@sus.ac.in

bos@sus.ac.in

NAAC Accredited-2022 B++ Grade (CGPA 2.96)

## अभ्यासमंडळे विभाग

संदर्भ : अभ्यासमंडळे विभागाची दि.१९/१०/२०२२ रोजीची मान्य टिपणी.

**कार्यालयीन आदेश :**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३४ (२) नुसार एकूण चार विद्याशाखा निश्चित केलेल्या आहेत. तसेच कलम १५(२) नुसार प्रत्येक विद्याशाखेसाठी पूर्ण वेतनी अधिष्ठातांची नियुक्ती करण्यासाठी बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने प्रत्येक विद्याशाखेशी संबंधित अधिष्ठातांच्या वतीने कामकाज पाहण्याकरिता मा.कुलगुरु महोदयांनी यापूर्वी नामनिर्देशन केल्यानुसार प्रभारी अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता यांना विद्यापीठाचे जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/७४९८ दि.०६/१०/२०२१ कार्यालयीन आदेश पारित केलेले आहेत.

परंतू मानविज्ञान विद्याशाखेचे नियमित अधिष्ठाता डॉ. डी. एस. तिकटे हे नियत वयोमानानुसार दि.३०/०९/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे मा. कुलगुरु महोदयांनी मानवविज्ञान विद्याशाखेकरिता प्रभारी अधिष्ठाता म्हणून खालीलप्रमाणे नामनिर्देशन केले आहे.

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव | नव्याने नामनिर्देशित प्रभारी अधिष्ठाता | नव्याने नामनिर्देशित सहयोगी अधिष्ठाता |
|---|---|---|---|
| १ | **मानवविज्ञान (Humanities)** | **डॉ. एस. एन. सलवदे** | -- |

| अ. क्र. | विद्याशाखेचे नाव | यापूर्वी नामनिर्देशित प्रभारी अधिष्ठाता | यापूर्वी नामनिर्देशित सहयोगी अधिष्ठाता |
|---|---|---|---|
| १ | विज्ञान व तंत्रज्ञान (Science & Technology) | प्राचार्य डॉ. एस. डी. नवले | प्राचार्य डॉ. सी. एस. सुर्यवंशी |
| २ | वाणिज्य व व्यवस्थापन (Commerce & Management) | प्राचार्य डॉ. एस. के. पाटील | -- |
| ३ | आंतर-विद्याशाखीय अभ्यास (Interdisciplinary Studies) | डॉ. व्ही. पी. शिखरे | -- |

१) **प्रभारी अधिष्ठाता/सहयोगी अधिष्ठाता म्हणून तज्ज्ञ व्यक्तींचा पदावधी:** सदरची नेमणूक विद्यापीठाकडून पुढील आदेश होईपर्यत किंवा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १५(२) / १५(५) नुसार अधिष्ठातांची नियमित नियुक्ती होणे यापैकी जे अगोदर घडेल तिथपर्यंत राहील.

२) **अधिकार व कर्तव्य:** अधिकार व कर्तव्य हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १६ व १५(५) नुसार राहतील.

३) **वेतन:** सदर अधिकच्या कार्यभारासाठी विद्यापीठाकडून कोणताही मोबदला देय असणार नाही तथापि विद्यापीठ नियमानुसार प्रवास खर्च व दैनंदिन भत्ता आदा करण्यात येईल.

४) नियुक्त केलेल्या प्रभारी अधिष्ठातांनी कामकाज पार पाडण्यासाठी विद्यापीठामध्ये पूर्ण वेळ उपस्थित न राहता स्वत: चे महाविद्यालयीन/संकुलांचे नियमित अध्यापन व प्रशासकीय कामकाज सांभाळून हा अधिकचा कार्यभार पार पाडणे करिता आवश्यकतेनुसार विद्यापीठात उपस्थित रहावे.

आदेशान्वये,

०९/११/२२

**(योगिनी घारे)**

कुलसचिव

**संदर्भ : पुअहोसोविसो/अमंवि/२०२२/** 8704 **दि.** 10 NOV 2022

**प्रति,**

२) डॉ. एस. एन. सलवदे यांना या ओदशाची प्रत देवून कळविण्यात येते की दि.०९/११/२०२२ पासून आपली प्र.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा पदी नियुक्ती झाल्याने आपले सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा पद संपुष्टात येत आहे.

**प्रत माहितीस्तव :**

१) मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, पुअहोसोविसो
२) मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, पुअहोसोविसो
३) मा. प्र.कुलसचिव महोदयांचे कार्यालय, पुअहोसोविसो
४) सर्व प्रशासकीय विभाग, पुअहोसोविसो
५) मा. संचालक, विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले, पुअहोसोविसो
६) मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, पुअहोसोविसो
७) मा. डॉ. डी. एस. तिकटे, मोहोळ
८) मा. प्र. अधिष्ठाता व सहयोगी अधिष्ठाता, चारही विद्याशाखा, पुअहोसोविसो

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)